
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

पुढारी



कोल्हापूर : शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे मशाल पेटवून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. समवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे आदी.

# शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामुळे खेळाडूंना व्यासपीठ : कुलगुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांमधील विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधीत्व करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागामार्फत आयोजित शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२५ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण व ज्योत प्रज्वलन उपक्रमांनी सोमवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या तिसऱ्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी ध्वजवंदन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या विविध ३० अधिविभागांतील २,३०० क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले.

याप्रसंगी विद्यापीठाची शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिच्या हस्ते उद्घाटनस्थळी क्रीडा ज्योतीचे आगमन झाले. मान्यवरांच्या हस्ते शिवस्पंदन स्पर्धेची ज्योत प्रज्वलित करण्यात आली.

यावेळी क्रीडापटूंनी जिम्नॅशियम, योगा, मल्लखांब, धनुर्विद्या, घोडेस्वारी क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. त्यानंतर आकाशात फुगे सोडून औपचारिक उद्घाटन झाल्याचे घोषित करण्यात आले. स्वप्नाली वायदंडे हिने सहभागी खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. राजेंद्र सोनकवडे आदी उपस्थित होते.

04 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शानदार संचलनाने 'शिवस्पंदन'ला प्रारंभ

## २३०० खेळाडूंचा सहभाग; योगा, मल्लखांब, धनुर्विद्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आणि ज्योत प्रज्वलन अशा उपक्रमांनी आज सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला शानदार वातावरणात प्रारंभ झाला.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागामार्फत आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी रोपट्यास पाणी घालून केले. विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमधील विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी गेली तीन वर्षे शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यानिमित्ताने विद्यापीठाच्या खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची मोठी संधी उपलब्ध झाल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. ध्वजवंदनानंतर विद्यापीठाच्या विविध ३० अधिविभागांतील २३०० क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले. त्यातून त्यांनी पाणी बचत, पर्यावरण संवर्धन आदी सामाजिक विषयांवर फलकांच्या माध्यमातून प्रबोधन केले. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिच्या हस्ते क्रीडाज्योतीचे आगमन झाले आणि त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. स्वप्नालीने सहभागी खेळाडूंना शपथ दिली. यावेळी क्रीडापटूंनी जिम्नॅशियम, योगा, मल्लखांब, धनुर्विद्या, घोडेस्वारी या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, सागर डेळेकर, रामचंद्र पवार, तानाजी चौगुले, तृप्ती करेकट्टी, राजेंद्र सोनकवडे, अण्णासाहेब मोहळकर, केशव राजपुरे, राजाराम गुरव, राहुल माने, प्रशांत पाटील, राजेंद्र रायकर, धनंजय पाटील आदी उपस्थित होते. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाची ज्योत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. यावेळी डावीकडून डॉ. अजितसिंह जाधव, श्रीकृष्ण महाजन, पी. एस. पाटील, शरद बनसोडे, महादेव देशमुख, तानाजी चौगले आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला क्रीडापटूंच्या शानदार संचलनाने प्रारंभ झाला.

### सात क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा

■ महोत्सवात मैदानी स्पर्धा, बास्केटबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट अशा सात क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडू सहभागी झाले आहेत. पहिल्या दिवशी क्रिकेट, महिला बॅडमिंटन, बुद्धिबळ या स्पर्धांना प्रारंभ झाला.

04 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रात्यक्षिकांनी क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन

## क्रीडाज्योत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द : मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांच्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाला खेळाडूंच्या प्रात्यक्षिकांनी प्रारंभ झाला. मल्लखांब, जिमनॅस्टिक, योगा, हॉकी आदी खेळांचे खेळाडूंनी सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलीत करण्यात आली. सर्व अधिविभागाच्या खेळाडूंनी मान्यवरांना मानवंदना दिली.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटनप्रसंगी मल्लखांबची प्रात्यक्षिक सादर करताना खेळाडू. दुसऱ्या छायाचित्रात योगाची प्रात्यिक्षक सादर करताना खेळाडू.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील १८ खेळाडूंनी ऑल इंडिया विविध खेळांमधील स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. ॲथलेटिक्समध्ये जनरल चॅम्पियनशिप मिळवली. खेलो इंडियामध्ये बाराव्या क्रमांकाचे स्थान मिळवले. फ्रान्स येथे झालेल्या स्पर्धेत बारा खेळाडूंपैकी ६ खेळाडू शिवाजी विद्यापीठाचे होते. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार, अर्जुन पुरस्कार मिळवून विद्यापीठाची मान उंचावली आहे. आरोग्यदायी जीवनासाठी मैदानावरील खेळ आवश्यक आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळले पाहिजेत. खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंनी खाशाबा जाधव, पीटी उषा, राही सरनोबत, हॉकीपटू, क्रिकेटपटूंची वेशभूषा करीत क्रीडा संचलनात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सध्याच्या युगात तंत्रज्ञानाला किती महत्व आहे. वाढता सायबर क्राईम कसा रोखायचा याचेही प्रात्यक्षिक दाखवले. योगा आणि मल्लखांबा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकवला. विद्यापीठातील क्रीडांगणावर विद्यार्थी खेळाडूंनी जल्लोष केला. सात प्रकारात क्रीडा स्पर्धा होणार आहेत. सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या अधिविभागाला चॅम्पियन विजेतेपद दिले जाणार आहे. त्यामुळे आपल्या अधिविभागाला चॅम्पियन विजेतेपद मिळावे म्हणून खेळाडूंनी प्रयत्न करण्याचा निर्धार केला. या खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी सर्व अधिविभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या स्वप्नाली वायदंडे यांनी खेळाडूंना शपथ दिली. डॉ. एन. डी. पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. के. डी. सोनवणे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
लोकमत


# शिवस्पंदन महोत्सवात चित्तथरारक प्रात्यक्षिके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आणि ज्योत प्रज्वलन या उपक्रमांनी सोमवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या तिसऱ्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. मैदानी स्पर्धा, बास्केटबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कबड्डी, व्हॉलिबॉल, क्रिकेट अशा सात क्रीडा प्रकारांत खेळाडूंचा सहभाग आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा आणि शारीरिक शिक्षण अधिविभागामार्फत हा महोत्सव आयोजित केला आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

यावेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिच्या हस्ते क्रीडा ज्योतीचे आगमन झाले. क्रीडापटूंनी जिम्नॅशियम, योगा, मल्लखांब, धर्नुविद्या, घोडेस्वारी या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, तानाजी चौगुले, तृप्ती करेकट्टी, राजेंद्र सोनकवडे, आण्णासाहेब मोहळकर, केशू राजपुरे, राजाराम गुरव, राहुल माने, प्रशांत पाटील, राजेंद्र रायकर उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात सोमवारी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाची सुरुवात झाली. यामध्ये खेळाडूंनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली.

**३०** अधिविभागांतील २३०० क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025

तरुण भारत



कोल्हापूर : मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. श्रीकृष्ण महाजन

# प्रा. श्रीकृष्ण महाजन यांना डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना त्यांच्या वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षण व संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र कॉमर्स टीचर्स असोसिएशनने डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र वाणिज्य परिषदेत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवडे व डॉ. टि. ए. शिवारे यांच्या हस्ते प्रा. महाजन यांचा सन्मान करण्यात आला.

त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे जे अध्ययन, अध्यापन, संशोधन व विस्तारकार्य केले आहे त्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांचचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

प्रा महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे २९ वर्षे अध्यापन केले आहे. तर अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे. एकवीस विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पदवीचे संशोधन पूर्ण केले आहे. ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत. वित्तीय व्यवस्थापन व अधिकोशीय अनुसंधान या विषयातील दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे रा. ना. गोडबोले अध्यासनाचे प्राध्यापक, डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तसेच विद्यापीठ अनुदान आयोग स्थापित सामाजिक समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले. तसेच शिवाजी विद्यापीठाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
तरुण भारत

# कोल्हापुरात ६, ७ रोजी सृष्टी संजीवन परिषद

▪ विद्यापीठामधील राजर्षी शाहु सभागृहात होणार परिषद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि इंडियन सोसायटी ऑफ हीटींग, रेफिरजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स (इशरे कोल्हापूर चाप्टर) यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व ७ मार्चला सृष्टी संजीवन या राष्ट्रीय पर्यावरण परिषदचे आयोजन केले आहे. ही परिषद शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहु सभागृहात होत आहे, अशी माहिती इशरे कोल्हापूर चाप्टरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर, नॅशनल प्रोग्राम चेअर, इशरे कोल्हापूर चाप्टरचे डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी सोमवारी पत्रकार बैठकीत दिली.

इशरे कोल्हापूर चाप्टरचे अध्यक्ष पुंगावकर आणि डॉ. कुलकर्णी म्हणाले, ६ आणि ७ मार्च या दोन दिवसीय परिषदेला गुरुवारी सकाळी १० वाजता सुरुवात होणार असून, या परिषदेला खासदार श्रीमंत शाहु छत्रपती, मेजर जनरल डॉ. श्री पाल आणि कोल्हापूर महापालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी कार्तिकियन, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमोद माने यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

पूर, पाणी, प्रदूषण, प्रकाश हे घटक सध्या हवामानातील बदलात फारच प्रभावी ठरत आहेत. शास्त्रीय दृष्टीकोनातून याची कारणमिमासा व उपाय योजना याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग, पर्यावरण, आधिविभाग, वातावरणीय बदल शाश्वत उपाय अभ्यास केंद्र भूगोल अधिविभाग आणि इंडियन सोसायटी ऑफ डिटींग रेफ्रीजरेटींग, एअर कंडीशनींग इंजिनिअर्स यांच्या सहभागातून या परिषदेचे आयोजन करण्यात आले . या पत्रकार बैठकीला अनिल इंगवले, योगेश गांधी, विजय पाटील हे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात दोन दिवस सृष्टी संजीवन राष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पूर, पाणी, प्रदूषण यांचा सृष्टीवर होणारा परिणाम या विषयावर शिवाजी विद्यापीठात दि. ६ आणि ७ मार्च रोजी दोन दिवसांच्या सृष्टी संजीवन राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेटिंग, एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (इशरे)च्या कोल्हापूर चॅप्टरचे नॅशनल प्रोग्रॅम चेअर डॉ. गिरीश कुलकर्णी आणि कोल्हापूरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर यांनी दिली.

पूर, पाणी, प्रदूषण, प्रकाश हे घटक सध्या हवामान बदलात फारच प्रभावी ठरत आहेत. सामाजिक जीवनात याचे परिणाम प्रकर्षाने जाणवतात. शास्त्रीय दृष्टिकोनातून याची कारणमीमांसा आणि उपाययोजना याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. हा हेतू ठेवून आयोजित या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन गुरुवार, दि. ६ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात सकाळी १० वाजता खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

सकाळ

# विद्यापीठात 'सृष्टी संजीवनी' राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठ व इशरे कोल्हापूर चाप्टर यांच्या वतीने विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात गुरुवारी (ता.६) व शुक्रवारी (ता.७) 'सृष्टी संजीवनी' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे इशरे कोल्हापूर चाप्टरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. कोल्हापूर व सांगली जिल्ह्याला भेडसावणाऱ्या पर्यावरण, पाणी, पूरस्थिती, प्रदूषण, प्रकृती, प्रकाश, धुलीकण व ध्वनी यांचा अभ्यास परिषदेत होणार आहे.

पुंगावकर म्हणाले, 'परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी खासदार शाहू महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. यावेळी महापालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकियन एस., मेजर जनरल डॉ. श्रीपाल व रवींद्र देभनाथ उपस्थित राहणार आहेत.' डॉ. गिरीश कुलकर्णी म्हणाले, ' शिवाजी विद्यापीठ व इशरे चाप्टरच्या वतीने पुढील २५ वर्षे, ५० वर्षे व शंभर वर्षांकरिता कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांना कोणकोणत्या गोष्टी काळजीपूर्वक केल्या पाहिजेत व कोणत्या गोष्टी टाळायला हव्यात, यासाठी सरकारला रोड मॅप देण्यात येणार आहे. त्याकरिता संयुक्त चर्चा करण्यासाठी व एकत्रित काम करण्यासाठी या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.' पत्रकार परिषदेस अतुल इंगवले, आवेश भुसेणी, योगेश गांधी, विजय पाटील, रमेश पोवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

पुढारी

# कॉ. दत्ता देशमुख महाराष्ट्राचे लोकशिक्षक : प्रा. पांडे

**• शिवाजी विद्यापीठात कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे व्याख्यान**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कॉ. दत्ता देशमुख यांनी ग्रामीण व शहरी भागातील संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे संघटन केले. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. शेतकरी, कामगार वर्गामध्ये जाणीव जागृती केली. कॉ. दत्ता देशमुख हे महाराष्ट्राचे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन प्रा. राजू पांडे यांनी काल केले.

शिवाजी विद्यापीठाचे कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कॉ. दत्ता देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कॉ. दत्ता देशमुख पुरोगामी विचार मंचाचे सचिव बाबुराव तारळी अध्यक्षस्थानी होते.

प्रा. पांडे म्हणाले, कॉ. दत्ता देशमुख यांनी तत्त्वनिष्ठ राजकारण केले. आज महाराष्ट्रात संधीसाधू आणि तडजोडीचे राजकारण घडत आहे. कॉ. देशमुख हे खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. त्यांनी रचनात्मक आणि विधायक कार्य केले. शेती प्रश्न, पाणी प्रश्न यासह दुष्काळग्रस्त, विस्थापित, धरणग्रस्त, पर्यावरण, लोकसंख्या नियंत्रण अशा विविध घटकांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांनी आवाज उठविला.

बाबूराव तारळी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर यांनी प्रास्ताविक तर अक्षय जहागिरदार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त उद्या कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात दि. ५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र, 'बेटी बचाओ अभियान', श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, लेडीज हॉस्टेल, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू-प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा लाभ महिलांनी घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. प्रतिभा देसाई, प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. वर्षा जाधव, प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर आणि प्रा. डॉ. पी एम.चौगुले यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी (दि. ५) कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात सकाळी साडेदहा वाजता कार्यशाळेची सुरुवात होईल. 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' असा कार्यशाळेचा विषय आहे. अध्यक्षपदी कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के आहेत. कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाचे स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, लेडीज हॉस्टेल, विद्यार्थी विकास विभागाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
सकाळ

# महिला दिनानिमित्त उद्या कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३ : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी (ता. ५) सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा होणार आहे. 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' असा या कार्यशाळेचा विषय आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठअंतर्गत तक्रार समिती, मुलींचे वसतिगृह, विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित या कार्यशाळेत विद्यापीठातील महिला प्राध्यापक, प्रशासनातील महिला अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार आहेत. त्यांना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

सकाळ

# कमला कॉलेजमध्ये 'माय भारत पोर्टल' ॲपचे प्रात्यक्षिक

**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे 'माय भारत पोर्टल' ॲप प्रात्यक्षिक उपक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर होत्या. याप्रसंगी नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक पूजा सैनी व ऑडिशन डायरेक्टर डॉ. देवेंद्र व्यास यांनी विद्यार्थिनींना ॲप-इ. एल. पी. ची माहिती दिली. या ॲपद्वारे भारतीय युवक विविध उद्योग, व्यवसाय विकसित करण्यास सक्षम बनेल. त्याला केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती मिळेल हे सांगून शिक्षण, कृषी, आरोग्य, उद्योग या क्षेत्रातील रोजगार व व्यवसायाच्या संधी कशाप्रकारे मिळवाव्यात याची माहिती कशी मिळवावी याची प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. स्वाती कांबळे यांनी सूत्रसंचलन केले. प्रा. डॉ. विश्वनाथ तराळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
तरुण भारत

# कमला कॉलेजमध्ये 'माय भारत पोर्टल'चे प्रात्यक्षिक

**कोल्हापूर :** कमला कॉलेज व शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत 'माय भारत पोर्टल अॅप" प्रात्यक्षिक उपक्रम राबवण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर होत्या. या अॅपमुळे भारतीय युवक विविध उद्योग, व्यवसाय विकसित करण्यास सक्षम बनेल. 'डॉ. सुजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. स्वाती कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विश्वनाथ तराळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025
सकाळ

# अनोश कामतचे यश



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उच्च आणि तंत्र शिक्षण विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत अनोश कामत याने यश मिळवले. येथील गोपाळकृष्ण गोखले कॉलेजचा तो विद्यार्थी असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित शिबिरात ही स्पर्धा झाली. शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेअरमन डॉ. मंजिरी देसाई- मोरे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगुले, प्राचार्य आर. बी. भुयेकर, एनएसएस अधिकारी प्रा. डॉ. एस. जी. राक्षसे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या महिला दिनानिमित्त कार्यशाळा

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवार, ५ रोजी सकाळी १०.३० वाजता शाहू सिनेट सभागृहात कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' हा या कार्यशाळेचा विषय आहे. अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. डी. टी शिर्के भूषवणार आहेत. कार्यशाळेचे आयोजन, विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, लेडीज हॉस्टेल, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.